


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक १२ • गुरुवार दि.१ ऑक्टोंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# भारतीय पायलट स्मित मच्छार यांच्या शौर्याचे जगभर कौतुक

## पंतप्रधान मोदींसह इस्त्रायलचे पंतप्रधान नेतन्याहूंकडून गौरव





नवी दिल्ली: दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या विमानात निर्माण झालेल्या गंभीर प्रसंगी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी असामान्य धैर्य दाखविणारे भारतीय पायलट कॅप्टन स्मित मच्छार यांचे जगभरातून कौतुक होत आहे. विमानाच्या कॉकपिटमध्ये झालेल्या हल्ल्यात चाकूने गंभीर जखमी झाल्यानंतरही त्यांनी प्रसंगावधान राखत विमान सुरक्षित ठेवण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या शौर्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे वृत्त आहे.

दुबईहून तेल अवीवकडे जाणाऱ्या फ्लायदुबईच्या विमानात प्रवासादरम्यान कॉकपिटमध्ये पायलट आणि को-पायलटमध्ये झटापट झाली. यावेळी को-पायलटकडून कॅप्टन स्मित मच्छार यांच्यावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. हल्ल्यात गंभीर जखमी होऊनही मच्छार यांनी परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ दिली नाही. विमानाचे त्यानंतर सौदी अरेबियातील तबूक विमानतळावर आपत्कालीन लँडिंग करण्यात आले.या घटनेत विमानातील प्रवाशांचा जीव धोक्यात आला होता. मात्र, जखमी अवस्थेतही कॅप्टन मच्छार यांनी दाखवलेल्या धैर्यामुळे मोठी दुर्घटना टळली. त्यांच्या या कामगिरीचे इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी कौतुक केले असून, त्यांनी मच्छार यांना सच्चा नायक संबोधले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही कॅप्टन स्मित मच्छार यांच्या शौर्याचे कौतुक केले. यूपीएससीच्या कार्यक्रमाच्या सुरुवातीला बोलताना मोदी यांनी मच्छार यांच्या धैर्याचा विशेष उल्लेख केला. या घटनेत त्यांनी असंख्य प्रवाशांचे प्राण वाचवण्यासाठी दाखवलेले शौर्य देशासाठी अभिमानाची बाब असल्याचे मोदी यांनी सांगितले. तसेच मच्छार यांच्या कुटुंबीयांशी संवाद साधून पान ४ वर

# तहसीलदारांची यशस्वी शिष्टाई;आंदोलनाला तात्पुरता ब्रेक

## नवरात्रीपूर्वी कामे पूर्ण न झाल्यास घटस्थापनेला पुन्हा उपोषण



माहूर/प्रतिनिधी-श्रीक्षेत्र माहूर शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील रखडलेल्या विविध विकास कामांविरोधात सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार राज ठाकूर आणि अपिल बेलखोडे यांनी सुरू केलेल्या आमरण उपोषणाला गुरुवारी निर्णायक वळण मिळाले. शहरातील रखडलेली कामे नवरात्रीपूर्वी पूर्ण करण्याच्या मागणीसाठी पुकारण्यात आलेल्या रस्ता रोको आंदोलनाला सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, समाजसेवक, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष व नगरसेवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहत जोरदार पाठिंबा दिला. आंदोलकांच्या घोषणांनी महामार्ग परिसर दणाणून गेल्यानंतर काही काळ महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली.

रस्ता रोकोच्या ठिकाणी तहसीलदार डॉ. अभिजीत जगताप आणि पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी धाव घेत आंदोलकांशी चर्चा केली. प्रशासनाच्या वतीने संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आल्यानंतर वाहतूक सुरळीत करण्यात आली. मात्र, केवळ आश्वासनावर आंदोलन मागे न घेता ठोस लेखी कार्यवाहीची मागणी आंदोलकांनी कायम ठेवली, दुपारी तहसीलदार डॉ. अभिजीत जगताप यांनी संबंधित विभागाशी पत्रव्यवहार करून उपोषणकर्ते राज ठाकूर व अपिल बेलखोडे यांना त्यांच्या मागण्यांबाबत लेखी पत्र दिले. नवरात्र महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माहूर शहरातील रखडलेली महामार्गाची कामे पूर्ण करण्यासाठी संबंधित विभागाला सूचना देण्यात येतील, तसेच ऑक्टोबर रोजी होणाऱ्या संभाव्य नवरात्र नियोजन बैठकीपूर्वी महामार्ग विभागासोबत स्वतंत्र बैठक घेऊन शहरातील प्रलंबित कामांचा आढावा घेण्यात येईल, असे प्रशासनाने लेखी कळविले. प्रशासनाच्या या लेखी आश्वासनानंतर पत्रकारांनी आपले आमरण उपोषण तूर्तास स्थगित करण्याचा निर्णय घेतला. तहसीलदार डॉ. अभिजीत जगताप यांच्या हस्ते राज ठाकूर व अपील बेलखोडे यांना ज्यूस देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली. मात्र, यावेळी आंदोलकांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला की, नवरात्रीपूर्वी रखडलेली कामे प्रत्यक्ष सुरू करून पूर्ण करण्याच्या दिशेने ठोस कार्यवाही झाली नाही, तर घटस्थापनेच्या दिवशी पुन्हा आमरण उपोषण सुरू करण्यात येईल. यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख ज्योतिबा खराटे, नगराध्यक्ष फिरोज दोसानी, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष समाधान जाधव, उपनगराध्यक्ष नाना लाड, भाजपाचे तालुकाध्यक्ष निळकँठ मस्के, माजी नगराध्यक्ष समरभाऊ त्रिपाठी, नगरसेवक गोपू महामुने, आनंद तुपडाळे, अनिल वाघमारे, भाजप महिला आघाडीच्या नेत्या संध्याताई राठोड यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, पत्रकार संघाचे पदाधिकारी, सदस्य, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वच्छता दूत माधवराव पाटील शेळगावकर यांचे निधन



नायगाव/प्रतिनिधी-संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता समितीचे महाराष्ट्राचे प्रथम अध्यक्ष तथा ज्येष्ठ समाजसेवक माधवराव पाटील शेळगावकर (वय ८३) यांचे गुरुवार, दि.१ ऑक्टोबर रोजी सकाळी दुःखद निधन झाले.

स्वच्छता दूत माधवराव पाटील शेळगावकर हे गेल्या काही काळापासून कॅन्सरच्या आजाराने त्रस्त होते. त्यांच्यावर पुणे येथे दीर्घकाळ उपचार सुरू होते. वयोमानानुसार त्यांची प्रकृती खालावत गेली आणि अखेर गुरुवारी सकाळी त्यांचे निधन झाले. शेतकरी चळवळीतून त्यांच्या सामाजिक कार्याला सुरुवात झाली. सुमारे बारा वर्षे त्यांनी शेतकरी संघटनेत कार्यरत राहून शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आंदोलने केली. त्यानंतर त्यांनी पंचायत समिती, बाजार समिती आणि जिल्हा परिषदेत विविध पदे भूषवून सार्वजनिक जीवनात योगदान दिले. सन २००२ पासून त्यांनी शेळगाव गौरी गावाच्या सर्वांगीण विकासाकडे लक्ष केंद्रित केले. ग्रामस्वच्छता, जलव्यवस्थापन, सामाजिक प्रबोधन आणि लोकसहभागातून ग्रामविकासासाठी त्यांनी मोठे काम केले. राज्य शासनाने त्यांची राज्यस्तरीय संत गाडगेबाबा ग्रामीण स्वच्छता समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्रासह विविध गावांमध्ये जाऊन स्वच्छतेचे प्रबोधन केले. त्यांच्या कार्यामुळे शेळगाव गौरीला ग्रामस्वच्छता व ग्रामविकासाच्या क्षेत्रात राज्यस्तरावर ओळख मिळाली. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सामाजिक, ग्रामविकास आणि ग्रामस्वच्छता क्षेत्राची मोठी हानी झाली असून शेळगाव गौरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. ज्येष्ठ नेते माधवराव पाटील शेळगावकर यांच्या निधनाबद्दल अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे.

## सीजेपीच्या आंदोलनाला विरोधकांचा पाठिंबा

मुंबई/प्रतिनिधी-कॉकरोच जनता पार्टीचे नेते अभिजीत दीपके यांच्या आंदोलनाला विरोधी पक्षांकडून पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे. शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेससह राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनीही आंदोलनाला पाठिंबा दर्शविल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे शिवाजी पार्क येथे होणाऱ्या या आंदोलनाला राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त झाले आहे. निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरुध्द सीजेपीचे प्रमुख अभिजीत दीपके यांनी आंदोलन पुकारले आहे.

# स्वामी रामानंद तिर्थ यांच्या जयंतीनिमित्त आनंदी विकास यांचे शनिवारी व्याख्यान



नांदेड/प्रतिनिधी-पीपल्स कॉलेज येथे पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्वामी रामानंद तीर्थ व्याख्यानमालेचे चौथे पुष्प शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता नहर कुरुंदकर सभागृहात गुंफले जाणार आहे. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक आनंदी विकास हे मराठी कविता आणि कवितेतील संगीत या विषयावर व्याख्यान देणार आहेत.

या कार्यक्रमाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील यांनी लिहिलेल्या आणि आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलेल्या संस्थेच्या गीताचे लोकार्पण यावेळी करण्यात येणार आहे. त्यामुळे साहित्य, कविता आणि संगीताचा अनोखा संगम या कार्यक्रमातून अनुभवता येणार आहे. व्याख्यानमालेचे अध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील राहणार असून, प्रमुख उपस्थितीत संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल, सचिव मा. प्रा. श्यामल पत्की, सहसचिव ॲड. प्रदीप नागापूरकर, डॉ.विकास सुकाळे, प्राचार्य डॉ. लक्ष्मण शिंदे, मुख्याध्यापक प्रशांत चौधरी उपस्थित राहणार आहेत.

# आश्रमशाळांच्या अनुदानासाठी ३५ लाखांची मागणी?

## सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्यावर गंभीर आरोप



धाराशिव:आश्रमशाळांचे अनुदान मंजूर होऊनही निधीचे वाटप केले जात नसून, निधी व कामांच्या मंजुरीसाठी ३५ ते ४० लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा गंभीर आरोप धाराशिव येथील संस्थाचालक अरुण निटुरे यांनी केला आहे. सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांच्या कार्यालयातील व्यक्ती पैसे गोळा करीत असल्याचा दावा त्यांनी फेसबुक लाइव्हद्वारे केला असून, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

केशेगाव येथील रमाबाई आंबेडकर आश्रमशाळा चालविणारे निटुरे यांनी निधीअभावी शाळा तीन वर्षांपासून बंद असल्याचे सांगितले. मार्च २०१९ मध्ये २० टक्के अनुदान मंजूर होऊनही त्याचे वाटप झाले नसल्याचा दावा त्यांनी केला. शाळेच्या दुरुस्तीसाठी व्याजाने पैसे घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. आश्रमशाळांच्या अनुदानासाठी ३५ ते ४० लाख रुपयांची मागणी केली जात असल्याचा आरोप करताना, यासंदर्भात पुरावे देण्याची तयारी असल्याचे निटुरे यांनी सांगितले. दलित वस्ती सुधार योजनेतील कामांसाठीही पैशांची मागणी होत असल्याचा आरोप त्यांनी केला. संजय शिरसाट यांच्या मालमत्ता आणि महागड्या वाहनांबाबतही निटुरे यांनी प्रश्न उपस्थित करून त्यांच्या संपत्तीची चौकशी करण्याची मागणी केली. गोरगरिबांच्या मुलांसाठी काम करणाऱ्या आश्रमशाळांचा निधी अडवू नका, असे आवाहन त्यांनी केले. दरम्यान, निटुरे यांनी केलेल्या आरोपांची स्वतंत्र पडताळणी झालेली नाही. या आरोपांवर सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट किंवा त्यांच्या कार्यालयाची अधिकृत प्रतिक्रिया उपलब्ध झालेली नाही.

## दुष्काळाच्या मागणीसाठी चार तास रस्ता रोको

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुका दुष्काळ यादीत ट्रिगर १ मध्ये समावेश करावा या प्रमुख मागणीसह विविध मागण्यांसाठी माजी जि.प. अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर व शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलबंरकर यांच्या नेतृत्वाखाली मुखेड येथील राज्य महामार्गावर तब्बल ४ तास रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. आंदोलन दरम्यान वाहतूक रस्त्याच्या दोन्ही बाजुनी ठप्प झाली होती. याप्रसंगी विविध पक्ष,संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हाधिकारी, आयुक्तांच्या निवासस्थानासमोर दिव्यांगांची गांधीगिरी;हातात झाडू घेवून केली स्वच्छता



नांदेड/प्रतिनिधी-दिव्यांग नागरिक व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी व महापालिकेचे आयुक्त यांच्या निवासस्थानासमोर दिव्यांगांनी आज (गुरुवार) हातात झाडू घेऊन स्वच्छता अभियान राबवत गांधीगिरी आंदोलन केले.

सर्वसमावेशक दिव्यांग सशक्तीकरण असोसिएशन, नांदेडचे संस्थापक अध्यक्ष राहुल सिताराम साळवे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या गांधीगिरी आंदोलनात नांदेड जिल्ह्यातून दिव्यांग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. महापालिकेचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या स्नेहनगर येथील निवासस्थानासमोर दिव्यांगांनी हातात झाडू घेवून स्वच्छता अभियान राबवत आंदोलन केले. आंदोलनस्थळी मनपा उपायुक्तांनी भेट देऊन आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेतले. त्यांनी मागण्यांचे निवेदन स्वीकारत संबंधित प्रश्न लवकरात लवकर सोडविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर महानगरपालिका आयुक्तांसह जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक यांना निवेदन देण्यात आले. निवेदनातून महानगरपालिकेतील दिव्यांग आरक्षण, २०० चौ.फुट जागा व शासकीय गाळे, दिव्यांगांचा शासकीय अनुशेष, घरकुल व इतर योजनांचा लाभ तसेच दिव्यांगांसाठीच्या ५ टक्के निधीचा पारदर्शक वापर यांची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच नांदेड जिल्ह्यातील दिव्यांग विशेष शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता, नियुक्ती, उपस्थिती, प्रत्यक्ष अनुभव, विद्यार्थी संख्या, पदमान्यता व शासन अनुदान यांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची मागणी करण्यात आली.

दिव्यांग शाळांमध्ये सांकेतिक भाषा व ऑरल-ओरल पद्धतीशी संबंधित आवश्यक प्रशिक्षित मनुष्यबळ, तसेच प्रारंभिक पुनर्वसनासाठी आवश्यक सुविधा व मनुष्यबळ उपलब्ध आहे का, याचीही तपासणी करण्याची मागणी करण्यात आली.तपासणीमध्ये अनियमितता, चुकीच्या नोंदी, नियमबाह्य नियुक्त्या किंवा शासकीय निधीच्या गैरवापराचे प्रकार आढळल्यास संबंधितांची जबाबदारी निश्चित करून लागू कायदे व नियमांनुसार प्रशासकीय तसेच आवश्यक असल्यास फौजदारी कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. या आंदोलनात शेख उमर, बाबु डुकरे, संभाजी सोनाळे, मिलिंद सितळे, प्रमोद मांजरमकर, रवि कोकरे, भोजराज शिंदे,संजय धुलधाणी, आतिक हुसेन, सय्यद आरिफ, कार्तिक कुमार भरतिपुरम, शिवाजी सुर्यवंशी, मोहम्मद सुफियान, पान ४ वर

# उशिरा सुचलेले शहाणपण

**निवडणूक आयोग हा लोकशाही व्यवस्थेचा कणा आहे.निवडणुका निष्पक्षपणे पार पडण्यासाठी आयोग स्वायत्त आणि विश्वासार्ह असणे आवश्यक आहे. मतदाराच्या मताचा योग्य सन्मान होईल, निवडणूक प्रक्रिया कोणत्याही दबावाखाली चालणार नाही आणि नियम सर्वांसाठी समान असतील, हा विश्वासच लोकशाहीची खरी ताकद आहे. मात्र गेल्या काही काळात निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत सातत्याने प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रश्नांना ठोस उत्तरे देण्याऐवजी त्याकडे दुर्लक्ष केले गेले, तर संशय अधिक गडद होणार हे उघड आहे.ईव्हीएमपासून मतदार यादीपर्यंत विविध मुद्द्यांवर विरोधकांनी आक्षेप घेतले. लोकसभा निवडणुकीनंतर मतांबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले. या आरोपांपैकी कोणते तथ्याधारित आहेत आणि कोणते राजकीय दावे आहेत, हे तपासण्याची जबाबदारी संबंधित यंत्रणांची आहे. परंतु आरोप करणाऱ्यांना उत्तर देणे आणि जनतेच्या मनातील शंका दूर करणे, ही आयोगाची घटनात्मक जबाबदारी आहे. कारण निवडणूक आयोगाच्या कामकाजावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले, तर निवडणुकीच्या निकालापेक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता चर्चेचा विषय बनते. अलीकडे आयोगाच्या अंतर्गत कामकाजाबाबतही मतभेदांच्या बातम्या समोर आल्या. मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर आयुक्तांमध्ये मतभेद असल्याचे वृत्त आले. निर्णय बहुमताने घेतले जात असल्याची चर्चा झाली. देशातील सर्वोच्च निवडणूक संस्थेबाबत अशा चर्चा होणे ही साधी प्रशासकीय बाब मानून चालणार नाही. आयोगाचे निर्णय योग्य असण्याबरोबरच ते पारदर्शक पद्धतीने घेतले जात आहेत, असा विश्वासही जनतेला वाटला पाहिजे. राहुल गांधी यांनी निवडणूक प्रक्रियेवर केलेल्या आरोपांनंतर आयोगाने त्यांच्याकडून माफीची अपेक्षा व्यक्त केली आणि कारवाईचा इशारा दिला. मात्र पुढे काय झाले, हा प्रश्न आजही चर्चेत आहे. माफी झाली नाही आणि कारवाईही झाली नाही. मग आयोगाची तीव्र भूमिका केवळ इशाऱ्यापुरती होती का, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. घटनात्मक संस्थेच्या अधिकाराची प्रतिष्ठा ही शब्दांपेक्षा कृतीतून सिद्ध होते.महाराष्ट्रातही विरोधी पक्षांनी राज्य निवडणूक आयोगाकडे तक्रारी केल्या. मात्र काही प्रकरणांत राज्य आयोगाने केंद्रीय आयोगाकडे निर्देश केला. अशा वेळी सामान्य नागरिकाने दाद मागायची तरी कुठे?, हा प्रश्न निर्माण होतो. जबाबदारी निश्चित न होणे आणि अधिकारांची टोलवाटोलवी होणे, हे कोणत्याही लोकशाही संस्थेला शोभणारे नाही.सध्या सर्वाधिक संवेदनशील विषय आहे, तो मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाचा एसआयआरचा. बिहार आणि पश्चिम बंगालमधील या प्रक्रियेवर विविध पक्षांनी आक्षेप घेतले. महाराष्ट्रातही एसआयआर सुरू आहे. अपात्र मतदारांची नावे वगळणे आवश्यक आहे; पण पात्र मतदाराचे नाव चुकूनही वगळले जाणार नाही, याची खबरदारी त्याहून महत्त्वाची आहे. कारण मतदार यादीतील चूक म्हणजे केवळ कागदावरील चूक नाही; ती नागरिकाच्या मतदानाच्या अधिकारावर परिणाम करू शकते.याच संदर्भात फॉर्म ६ महत्त्वाचा आहे. नव्या मतदाराला मतदार यादीत नाव नोंदविण्याची संधी देणारा हा मूलभूत अर्ज आहे. या प्रक्रियेत अनावश्यक अडथळे निर्माण झाले, तर सर्वाधिक फटका प्रथमच मतदान करणाऱ्या तरुणांना बसू शकतो. मतदार नोंदणी ही कोणत्याही पक्षाची कृपा नसून नागरिकाचा अधिकार आहे. त्यामुळे नियमांमध्ये बदल करताना आयोगाने अत्यंत सावधगिरी बाळगणे अपेक्षित आहे. आता फॉर्म ६ संदर्भातील काही दुरुस्त्या मागे घेण्यात आल्या असतील, तर त्याचे स्वागत करायलाच हवे. मात्र त्याचबरोबर हा प्रश्नही विचारावा लागेल, दुरुस्ती करण्याची गरज आधी का निर्माण झाली? त्याचा सामान्य मतदारावर होणारा परिणाम वेळेत का तपासला गेला नाही? नागरिक आणि राजकीय पक्षांनी आक्षेप घेतल्यानंतरच निर्णयाचा फेरविचार का करावा लागला? यालाच तर म्हणावे लागेल, उशिरा सुचलेले शहाणपण! निवडणूक आयोगाने आता बचावात्मक भूमिका सोडून पारदर्शकतेला प्राधान्य दिले पाहिजे. मतदार यादीतील बदल, नाव वगळण्याची कारणे, हरकतींची सुनावणी आणि नोंदणीची प्रक्रिया याबाबत स्पष्ट माहिती जनतेला मिळाली पाहिजे. आरोप करणारा कोणत्याही पक्षाचा असो, त्याला राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून नव्हे तर प्रक्रियेबाबत प्रश्न विचारणारा नागरिक म्हणून उत्तर मिळाले पाहिजे.लोकशाहीत निवडणुकीचा निकाल महत्त्वाचा असतोच; पण त्याहून महत्त्वाची असते निकालापर्यंत पोहोचण्याची प्रक्रिया. त्या प्रक्रियेवर जनतेचा विश्वास राहिला, तर पराभूत पक्षही निकाल स्वीकारतो आणि विजयी पक्षालाही नैतिक वैधता मिळते. म्हणून निवडणूक आयोगाने आता केवळ चुका दुरुस्त करण्यापेक्षा त्या चुका पुन्हा होणार नाहीत, अशी व्यवस्था उभी करणे गरजेचे आहे. उशिरा सुचलेले शहाणपण स्वागतार्ह आहे; पण लोकशाहीच्या पहारेकऱ्याला पुढे तरी शहाणपण वेळेवर सुचले पाहिजे!**

# स्वच्छतेपलीकडचा निर्मळ माणूस



ग्रामविकासाच्या वाटेवर आयुष्यभर चाललेला स्वच्छतादूत माधवराव पाटील शेळगावकर आज आपल्यात नाहीत,ही मोठी खंत आहे.काही माणसे एखाद्या पदामुळे मोठी होत नाहीत; तर आपल्या कार्यामुळे एखाद्या पदालाच मोठेपण प्राप्त करून देतात. काही व्यक्ती एखाद्या चळवळीचे नेतृत्व करतात; तर काहींच्या जाण्यानेच त्या चळवळीला पोरकेपणाची जाणीव होते. माधवराव पाटील शेळगावकर हे अशाच दुर्मीळ व्यक्तिमत्त्वांपैकी एक होते.१ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या निधनाची बातमी मनाला चटका लावून गेली. स्वच्छता चळवळ, ग्रामविकास आणि परिवर्तनवादी विचारांशी आयुष्यभर नाते जोडून राहिलेला हा कर्मयोगी आज आपल्यात नाही, ही जाणीवच अस्वस्थ करणारी आहे.त्यांच्या निधनाने एका व्यक्तीचे नव्हे, तर स्वच्छता आणि ग्रामविकासाच्या चळवळीतील एका जिवंत विचाराचे मोठे नुकसान झाले आहे.

'संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान म्हटले की महाराष्ट्रातील ग्रामविकासाच्या क्षेत्रात माधवराव पाटील शेळगावकर यांचे नाव आदराने घेतले जाते. स्वच्छता म्हणजे केवळ रस्ते झाडणे, कचरा उचलणे किंवा गाव सुंदर ठेवणे एवढ्यापुरता त्यांचा विचार कधीच मर्यादित नव्हता.त्यांच्या दृष्टीने स्वच्छता ही सामाजिक परिवर्तनाची पहिली पायरी होती.स्वच्छ गाव, जागरूक नागरिक, निरोगी जीवनशैली, पर्यावरणाचे भान, लोकसहभाग आणि ग्रामविकास यांची त्यांनी सांगड घातली. राज्यस्तरीय ग्रामस्वच्छता समितीचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या अनुभवातून अनेक विचार पुढे नेले. महाराष्ट्रातच नव्हे, तर देशातील विविध मंचांवर त्यांनी ग्रामस्वच्छता व ग्रामविकासाचा विचार मांडला. कोलंबो येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्वच्छता परिषदेत सहभाग नोंदविणे, ही त्यांच्या कार्याची व्यापकता दर्शविणारी बाब होती. त्यांचे माझी ग्रामविकासाची शेती हे आत्मचरित्र म्हणजे केवळ स्वतःच्या जीवनाची कहाणी नाही; ते ग्रामीण समाजजीवन, संघर्ष, ग्रामविकास आणि सामाजिक परिवर्तनाचा एक अनुभवग्रंथ आहे.शेतकरी कुटुंबातून आलेल्या व्यक्तीने सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात स्वतःची वाट निर्माण करताना कोणते अनुभव घेतले,कोणत्या अडचणींना सामोरे गेले आणि समाजासाठी काम करताना कोणती मूल्ये जपली, याचे दर्शन या प्रवासातून घडते.या पुस्तकातील अनुभव नव्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते आणि सार्वजनिक जीवनात प्रवेश करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी निश्चितच अनुभवांची शिदोरी ठरू शकतात. त्यांच्या आयुष्याकडे पाहिले की जाणवते-ग्रामविकास ही त्यांच्यासाठी एखादी योजना नव्हती; तो त्यांच्या जीवनाचा ध्यास होता.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा आणि परिवर्तनवादी विचारसरणीचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर ठसा होता. समाजातील अंधश्रद्धा, विषमता, अस्वच्छता आणि अन्याय यांच्याविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा त्यांना या विचारपरंपरेतून मिळाली.

शेतकरी प्रश्नांशीही त्यांचे घट्ट नाते होते. कै. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखालील शेतकरी संघटनेच्या माध्यमातून त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी काम केले. या प्रवासात अडचणी आल्या, त्रास सहन करावा लागला; मात्र समाजहितासाठी स्वीकारलेला संघर्ष त्यांनी कधी ओझे मानला नाही.शेळगाव गौरी हे त्यांचे गाव. या गावाच्या विकासासाठी त्यांनी केलेली धडपड पाहिली की त्यांनी केवळ गावाचा विकास केला नाही, तर गावाच्या विकासाची नवी कल्पनाच उभी केली, असे म्हणावेसे वाटते.गावाच्या सर्वांगीण उन्नतीचा विचार करताना त्यांनी भौतिक विकासाबरोबरच लोकसहभाग, सामाजिक जाणीव आणि स्वावलंबन यांनाही महत्त्व दिले. म्हणूनच त्यांच्या ग्रामविकासाच्या कामाकडे केवळ एका गावाच्या विकासाच्या चौकटीत पाहता येत नाही. ते ग्रामीण विकासाच्या व्यापक प्रयोगाचा भाग होते.माधवराव पाटील शेळगावकर यांची वाणी प्रभावी होती. पण त्या प्रभावीपणाला आक्रमकतेची किनार नव्हती. विचार ठाम, भाषा संयमी आणि माणसांविषयी आदर, हे त्यांच्या संवादाचे वैशिष्ट्य होते.एखादा विषय कसा मांडावा, मुद्दा कसा पटवून द्यावा आणि मतभेद असतानाही समोरच्या व्यक्तीचा सन्मान कसा राखावा, याचा वस्तुपाठ त्यांच्या संवादातून मिळत असे.त्यांच्या बोलण्यात द्वेष नव्हता, कटुता नव्हती. विषमताजन्य विचार आणि जातीय संकुचितपणापासून दूर राहून त्यांनी माणुसकी, समता आणि संवादाचा मार्ग स्वीकारला.म्हणूनच ते केवळ चांगले वक्ते नव्हते; ते संवादाचे महामेरू होते.

**पंडित पवळे**
नांदेड.

माधवराव पाटील शेळगावकर यांच्यात विचारांची खोली, संघटनकौशल्य, ग्रामीण प्रश्नांची जाण आणि संवादाची ताकद होती. सार्वजनिक जीवनात त्यांच्या कार्याचा आवाका पाहता, त्यांना राज्याच्या व्यापक राजकीय-सामाजिक क्षेत्रात आणखी मोठी भूमिका मिळाली असती, असे त्यांच्या कार्याचा परिचय असणाऱ्या अनेकांना वाटत राहिले.परंतु पद मिळाले किंवा नाही, यापेक्षा त्यांनी माणसांच्या मनात निर्माण केलेले स्थान अधिक महत्त्वाचे ठरते.त्यांच्या कार्याचा खरा गौरव पदांमध्ये नव्हे, तर त्यांनी जागवलेल्या सामाजिक जाणीवेत आहे. ग्रामविकास आणि स्वच्छता क्षेत्रातील त्यांच्या कार्याची दखल विविध स्तरांवर घेतली गेली. महात्मा गांधी तंटामुक्त गाव पुरस्कार, केंद्र सरकारचा यशवंत पंचायत राज समृद्ध ग्राम पुरस्कार तसेच राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील यांच्या हस्ते पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम पुरस्कार अशा गौरवांनी त्यांच्या कार्याला सन्मान मिळाला.मात्र पुरस्कार हे त्यांच्या कार्याचे अंतिम मोजमाप नव्हते. त्यांची खरी कमाई होती. गावागावात निर्माण झालेली स्वच्छतेची जाणीव आणि ग्रामविकासाच्या कामाला मिळालेली प्रेरणा.

माधवराव पाटील हे केवळ धडपडणारे कार्यकर्ते नव्हते. ते चिंतनशील होते.ध्यानसाधनेतही रमणारे होते. कर्म, चिंतन आणि साधना यांचा सुंदर संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जाणवत असे.माउंट अबू येथील ग्रामविकास परिषदेत त्यांनी मांडलेले विचार असोत किंवा विविध व्यासपीठांवरील त्यांचे भाषण त्यांच्या विचारांत अनुभवाची खोली आणि जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी जाणवत असे.त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता ही त्यांच्या अंतर्मनाच्या निर्मळतेची जणू साक्षच वाटायची.माझी आणि माधवराव पाटील शेळगावकर यांची भेट काही सार्वजनिक कार्यक्रमांतून झाली. वयाने आणि ज्ञानाने मोठ्या असलेल्या या व्यक्तिमत्त्वाविषयी मनात स्वाभाविकच आदर होता.त्यामुळे त्यांच्याशी फार जवळीक निर्माण करण्याचे धाडस झाले नाही.पण अंतर असूनही मनातला आदर मात्र कायम राहिला.प्रत्येक भेटीत त्यांच्या बोलण्यातून ग्रामविकासाची तळमळ, स्वच्छतेविषयीची बांधिलकी आणि माणसांविषयीची आपुलकी जाणवत असे.समोरच्या व्यक्तीला आदराने संबोधणे, त्याचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि त्याच्याशी सन्मानाने संवाद साधणे, हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सहज भाग होता.

आज त्यांच्या निधनाची बातमी समोर आली आणि त्या छोट्या-छोट्या भेटींच्या आठवणी अधिक मोठ्या वाटू लागल्या. काही व्यक्तींशी आपली जवळीक किती होती, यापेक्षा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने आपल्या मनावर किती ठसा उमटवला, हे अधिक महत्त्वाचे असते.त्यांच्या कार्यामुळे त्यांना महाराष्ट्राच्या पातळीवर स्वच्छतादूत म्हणून काम करण्याची संधी मिळाली.त्यांनी त्या संधीचे रूपांतर व्यापक सामाजिक संदेशात केले.स्वच्छता त्यांच्या हातात झाडू नव्हती; ती त्यांच्या विचारांची भाषा होती.गाव स्वच्छ असावे, पर्यावरण निरोगी असावे, माणसांमध्ये परस्पर सन्मान असावा आणि विकासात प्रत्येकाचा सहभाग असावा, हा त्यांचा विचार होता.म्हणूनच त्यांचे कार्य स्वच्छतागृहांपासून सुरू होऊन माणसाच्या मानसिकतेपर्यंत पोहोचते.आज चळवळ पोरकी झाली आहे...आज माधवराव पाटील शेळगावकर आपल्यात नाहीत. त्यामुळे स्वच्छता चळवळीतील एक अनुभवी, अभ्यासू आणि संवेदनशील आवाज हरपला आहे.पण एखाद्या कार्यकर्त्याचे खरे निधन तेव्हा होत नाही, जेव्हा त्याचा देह आपल्यातून निघून जातो. त्याने रुजवलेला विचार संपला तरच त्याच्या कार्याचा अंत होतो.माधवरावांनी रुजवलेली स्वच्छतेची जाणीव, ग्रामविकासाची तळमळ, समतेचा विचार, संवादाची संस्कृती आणि माणुसकीची भूमिका आजही जिवंत आहे.

हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे.आज त्यांच्या स्मृतीसमोर नतमस्तक होताना मनात एकच विचार येतोगाव स्वच्छ करण्यासाठी झाडू हातात घेणारे अनेक मिळतील; पण माणसांचे मन निर्मळ करण्यासाठी आयुष्य झोकून देणारे माधवराव पाटील शेळगावकर पुन्हा पुन्हा जन्माला येत नाहीत.त्यांनी स्वच्छतेला चळवळ दिली, ग्रामविकासाला दिशा दिली आणि सार्वजनिक जीवनाला माणुसकीची किनार दिली.नितळ-निर्मळ मनाच्या या स्वच्छतादूताला भावपूर्ण श्रद्धांजली!त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.त्यांच्या विचारांना सलाम.आणि त्यांनी दाखवलेल्या स्वच्छ, समतामूलक ग्रामविकासाच्या वाटेवर चालणेहीच त्यांना खरी आदरांजली!

# एक घर,एक शेवगाचा संकल्प;पालक सभेत वृक्षसंवर्धन व पौष्टिक आहाराचे मार्गदर्शन



उमरखेड/प्रतिनिधी- तेजमल गांधी कृषी विद्यालय ब्राह्मणगाव मध्ये आयोजित पालक सभेच्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून भाऊसाहेब माने कार्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या वतीने पालकांना २०० शेवगा रोपांचे वाटप करण्यात आले. यावेळी १६० पालक हजर होते.

वाढत्या वयातील विद्यार्थ्यांना पौष्टिक आहार मिळावा आणि त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी आवश्यक पोषक घटक आहारातून उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. शेवग्याच्या शेंगांची भाजी पौष्टिक असून त्यामध्ये कॅल्शियमसह विविध जीवनसत्त्वे व खनिजे आढळतात. प्रत्येक घरात एक शेवग्याचे झाड असावे, हा केवळ वृक्षलागवडीचा उपक्रम नसून आपल्या मुलांच्या पोषण व आरोग्याशी जोडलेला संकल्प आहे. कमी पाण्यात आणि घरातील सांडपाण्याचा उपयोग करून वाढणारा शेवगा दुष्काळी परिस्थितीतही कुटुंबाला पौष्टिक भाजीचा सहज स्रोत उपलब्ध करून देऊ शकतो असे मत संस्थेचे चेअरमन डॉ. विजय माने यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी अध्यक्ष, म्हणून अशोकराव निमलवाड तंटामुक्ती अध्यक्ष ब्राह्मणगाव प्रमुख अतिथी, सुनील पाटील देवसरकर पोलीस पाटील अरविंदराव धबडगे, साहेबराव सुरोशे, शिवाजीराव रंधे, मारोतरावजी माने, यशवंतराव बिट्टेवार, चंद्रभानजी थोटे ,गणपतराव बिट्टेवार, नंदू भाऊ जांभळे, गुलाबराव वानखेडे, अविनाश कुरमे मुख्याध्यापक व्ही.एन. सादुडे सर उपस्थित होते.

# आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस तर्फे राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षा

नांदेड/प्रतिनिधी-आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडतर्फे (एईएसएल) विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षमता, तयारी आणि स्पर्धात्मक कौशल्ये ओळखण्यासाठी आकाश राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षा (अँथे) २०२६ सुरू करण्यात आली आहे. गेल्या १६ वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचे मूल्यमापन करणारी ही परीक्षा देशातील मोठ्या विद्यार्थी मूल्यांकन उपक्रमांपैकी एक ठरली आहे.

स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीत विद्यार्थ्यांना काय अभ्यास करायचा, याबरोबरच आपण सध्या कुठे आहोत, कोणत्या विषयात आपली पकड चांगली आहे आणि कोणत्या बाबींमध्ये अधिक सुधारणा करण्याची गरज आहे, हे समजणे महत्त्वाचे असते. विद्यार्थ्यांच्या तयारीतील हीच उणीव भरून काढण्याच्या उद्देशाने अँथेची रचना करण्यात आली आहे.अँथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक तयारीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करता येते. परीक्षेतील कामगिरीच्या आधारे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमता आणि सुधारणेच्या क्षेत्रांची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला जातो. आतापर्यंत १ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी अँथेसाठी नोंदणी केली असल्याचे एईएसएलकडून सांगण्यात आले आहे.केवळ अंतिम गुण किंवा क्रमांकाच्या आधारे विद्यार्थ्यांची कामगिरी मोजण्याऐवजी अँथेची रचना निदानात्मक मूल्यांकनाच्या स्वरूपात करण्यात आली आहे. परीक्षेतील प्रश्न विशिष्ट संकल्पना आणि क्षमतांशी जोडलेले असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांचे विषयज्ञान, आकलन, विश्लेषणात्मक क्षमता तसेच परीक्षेतील कामगिरीचा विविध अंगांनी विचार केला जातो. अँथेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना



स्वतःच्या तयारीचे अधिक सखोल आकलन होण्यास मदत होते. कोणत्या संकल्पना अधिक स्पष्ट आहेत, कोणत्या विषयांमध्ये अधिक सराव आवश्यक आहे आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या दृष्टीने पुढील तयारी कशी करावी, याबाबत विद्यार्थ्यांना दिशा मिळू शकते.गेल्या १६ वर्षांच्या प्रवासात अँथेने प्रतिभा शोधण्याच्या उपक्रमापासून पुढे जात विद्यार्थ्यांसाठी संरचित शैक्षणिक मूल्यांकनाचे व्यासपीठ म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगांव शहरात सिमेंट रोडचे काम सुरु;मात्र नालीचा पत्ता नाही

## सूचना फलकाअभावी रहदारीला अडथळा,नगरसेवकांचेही दुर्लक्ष



हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील नागरी दवाखान्याच्या परिसरातून नगरपरिषद व न्यायालयाकडे जाणाऱ्या सिमेंट रस्त्याचे काम सध्या घाई गडबडीत सुरू आहे. मात्र, या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना आवश्यक असलेल्या नालीच्या कामाकडे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

रस्त्याचे काम करताना पावसाचे पाणी तसेच सांडपाणी वाहून जाण्यासाठी दोन्ही बाजूंना योग्य नालीची व्यवस्था करणे आवश्यक असताना प्रत्यक्षात नालीचे काम करण्यात आलेले नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे भविष्यात पावसाळ्यात पाणी साचणे, रस्त्याचे नुकसान होणे तसेच नागरिकांना ये-जा करताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे.दरम्यान, हा परिसर रहदारीच्या दृष्टीने महत्त्वाचा असतानाही सुरू असलेल्या सिमेंट रोडच्या कामाच्या ठिकाणी रस्ता काम सुरू आहे, पर्यायी मार्गाचा वापर करा किंवा वाहतुकीसाठी आवश्यक सूचना देणारे कोणतेही फलक लावण्यात आलेले नाहीत. त्यामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना अचानक सुरू असलेल्या कामाचा सामना करावा लागत असून वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे.विशेष म्हणजे, शहरातील महत्त्वाच्या भागात सुरू असलेल्या या कामाच्या दर्जा, नियोजन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेकडेनगरसेवकांचेही लक्ष नसल्याचे चित्र दिसून येत आहे. रस्त्याचे काम पूर्ण करण्यापूर्वी दोन्ही बाजूंना आवश्यक नालीची व्यवस्था करावी, कामाच्या ठिकाणी तातडीने सूचना फलक व सुरक्षाव्यवस्था उभारावी आणि संबंधित अधिकारी व लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष पाहणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# देवस्थानची जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याच्या मागणीसाठी किसान सभेची निदर्शने

माहूर/प्रतिनिधी-भीषण दुष्काळामुळे देवस्थान जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. मात्र प्रशासनाकडून या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे न केल्याने त्यांना अनुदाना - पासून वंचित राहावे लागत आहे. याच मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने माहूर तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली.

दुष्काळ जाहीर करून तातडीने सर्व शेतकऱ्यांचे पंचनामे करावेत आणि देवस्थान जमिनीवर पिढ्यानुपिढ्या शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनाही इतर शेतकऱ्यांप्रमाणे अनुदान वाटप करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.या आंदोलनाचे नेतृत्व किसान सभेचे राज्य सहसचिव कॉम्रेड शंकर सिडाम आणि राज्य कमिटी सदस्य कॉ. किशोर पवार यांनी केले. यावेळी बोलताना नेत्यांनी सांगितले की, देवस्थानच्या नावावर जमीन आहे म्हणून या शेतकऱ्यांना दुष्काळात वाऱ्यावर सोडणे अन्यायकारक आहे. कष्ट करणारा शेतकरी कोणत्याही जाती-धर्माचा असो, त्याला न्याय मिळालाच पाहिजे.जर प्रशासनाने या शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाहीतर तर २१ ऑक्टोंबर पासुन तहसील कार्यालयासमोर बेमुदत महामुक्काम आंदोलन करण्यात येईल असा इशारा किसान सभेच्या वतीने देण्यात आला.हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी प्रेमसिंग चव्हाण, किसन जगदाळे, गणेश जाधव, वसंत चव्हाण, दिनेश राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने किसान सभेच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. आंदोलनात परिसरातील शेकडो शेतकरी सहभागी झाले होते.

# सोनखेडमध्ये हवामान केंद्राचा पत्ता नाही;पर्जन्यमापक दोन वर्षांपासून बंद

## पीकविमा भरपाईवर परिणामाची भीती; शेतकऱ्यांची विमा कंपनी विरोधात घोषणाबाजी

नांदेड/प्रतिनिधी-सोनखेड मंडळात स्वयंचलित हवामान केंद्र असल्याचे कृषी विभागाकडून सांगितले जात असले तरी प्रत्यक्ष पाहणीत येथे केवळ पर्जन्यमापक असल्याचे शेतकरी व ग्रामपंचायत प्रतिनिधींनी निदर्शनास आणून दिले. हा पर्जन्यमापक मागील दोन वर्षांपासून बंद असून पर्जन्यमानाच्या नोंदीही व्यवस्थित घेतल्या जात नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

हवामानावर आधारित पीकविमा नुकसान भरपाई निश्चित करताना पाऊस, अतिवृष्टी, पावसातील खंड, तापमान व आर्द्रता यांसारख्या नोंदी महत्त्वाच्या असतात. मात्र सोनखेडमध्ये स्वयंचलित हवामान केंद्रच नसल्याने नुकसान भरपाईच्या निकषांवर शेतकऱ्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. मागील वर्षी अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान होऊनही अनेक शेतकऱ्यांना केवळ ११ हजार रुपये हेक्टरी भरपाई मिळाल्याचा दावा करण्यात आला. हळद पीकविमा योजनेत सोनखेड मंडळाचा समावेश असून दोन जोखीम टप्पे झाल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले. यावेळी उपस्थित शेतकऱ्यांनी विमा कँम्पनीकडून आर्थिक शोषण थांबवा, मनमानी कारभार बंद करा, हक्काची नुकसान भरपाई द्या अशा घोषणा देत संताप व्यक्त केला. माधवराव मोरे, आनंदराव मोरे, रघुनाथराव मोरे, शंकरराव मोरे, राघवेंद्र मोरे, ज्ञानोबाराव मोरे, गुलाबराव मोरे, बालासाहेब मोरे यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. या प्रकरणाची मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मुख्य सचिवांकडे निवेदनाद्वारे तक्रार करण्यात आली असून, मागील दोन वर्षांच्या पर्जन्यमान नोंदींची तपासणी करून सोनखेडमध्ये तातडीने स्वयंचलित हवामान केंद्र बसवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.



माजी उपमहापौर सरजितसिंघ गिल यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांची माजी खा.भास्करराव पाटील खतगावकर यांनी पुष्पहार घालून अभिष्टचिंतन केले. यावेळी माजी आ.ओमप्रकाश पोकर्णा, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या उपाध्यक्षा डॉ.मिनल पाटील खतगावकर, दीपक पावडे, बाळकृष्ण शिंदे, जोगेंद्रसिंघ खैरा, एन.डी.पवार, संदीप गोरे, नंदू पाटील रातोळीकर, परमवीरसिंघ गिल, नवज्योतसिंघ गिल व इतर उपस्थित होते.

# ३३ अन्यायग्रस्त जमातींसाठी उद्या नांदेडमध्ये मूक आंदोलन

नांदेड/प्रतिनिधी-राज्यातील ३३ अन्यायग्रस्त जमातींवर होत असलेल्या कथित अन्यायाविरोधात तसेच त्यांच्या प्रलंबित न्याय्य मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि.२ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड येथे मूक आंदोलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

शुक्रवारी दुपारी १ वाजता वजिराबाद येथील राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुतळ्यासमोर हे मूक आंदोलन होणार आहे. गेल्या काही काळापासून राज्यातील ३३ जमातींच्या हक्कांच्या प्रश्नांकडे शासनाचे पुरेसे लक्ष नसल्याचा आरोप आंदोलक संघटनांकडून करण्यात आला आहे. जात प्रमाणपत्र, जात वैधता तसेच विविध प्रशासकीय व सामाजिक हक्कांच्या प्रश्नांमुळे संबंधित समाजबांधवांना अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघटनेने म्हटले आहे. या मूक आंदोलनात नांदेड जिल्ह्यासह राज्यातील नागरिक, विविध समाजघटक, समाजबांधव तसेच न्यायप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन युनायटेड ट्रायबल सोशल जस्टिस संघटना, महाराष्ट्रचे अध्यक्ष अतुल पेदेवाड, सचिव सुनील टिप्परसे तसेच आंदोलनाच्या संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव पी.नरहरी यांचा शुक्रवारी नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव (भू.सं.) पी. नरहरी हे शुक्रवार, दि.२ ऑक्टोबर २०२६ रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

सहसचिव पी. नरहरी हे शुक्रवार, दि.२ ऑक्टोबर रोजी सकाळी ७ वाजता हैद्राबाद येथून नांदेडकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता त्यांचे नांदेड येथे आगमन होईल. त्यानंतर सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने आयोजित विशेष ग्रामसभेस ते उपस्थित राहतील. दुपारी १.३० वाजता जेवणासाठी वेळ राखीव ठेवण्यात आला आहे. त्यानंतर दु.२ ते ४ या कालावधीत ते जिल्हा प्रशासनाची भेट घेणार आहेत. त्यानंतर नांदेड येथून हैद्राबादकडे प्रयाण करतील.

# मुखेडला दुष्काळ यादीतून वगळल्याने क्रांतीकारी शेतकरी संघटनेचा रास्ता रोको

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, या प्रमुख मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.

संघटनेचे तालुकाध्यक्ष किरण पाटील वडजे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात प्रदेशाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पा.जाधव यांची उपस्थिती होती. शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटातून दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांचे शेती हेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे. शेतकरी खरीप हंगामासाठी बियाणे, खते, किटकनाशके आणि मशागतीवर मोठ्या प्रमाणात खर्च करतात. मात्र, नैसर्गिक संकटांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे आवश्यक असल्याची भूमिका क्रांतिकारी शेतकरी संघटनेने मांडली. मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करून पात्र शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये अनुदान देण्यात यावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

## जाहीर प्रगटन

मा.आर.पी.शिंदे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज १४३७/२०२६
रमाबाई व ईतर वि. निरंक
ने.ता. ०२/११/२०२६

अर्जदार:- १. रमाबाई शिवाजी पाईकराव, वय : ७० वर्षे, धंदा : घरकाम, रा.घर क्र.१-४-५४, जनाई निवास, सारनाथ नगर, तरोडा, ता.जि.नांदेड मो., २. रेखा राष्ट्रपाल हाटकर, वय : ४९ वर्षे, धंदा : घरकाम, रा.पावडेवाडी नाका, राजनगर जवळ,नांदेड, ३. सुनिल शिवाजीराव पाईकराव, वय : ४७ वर्षे, धंदा : व्यापार, रा.वैशालीनगर, तरोडा बु.नांदेड, ४. स्मिता रविंद्र दिवेकर, वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम, रा.घर क्र.सी ९/१५३, गल्ली क्र.१, छत्रपती विद्यालय, गजानननगर जवळ, गारखेडा औरंगाबाद, ह.मु.घर क्र.१-४-५४, जनाई निवास, सारनाथनगर, तरोडा, ता.जि.नांदेड, ५. छाया श्याम हाटकर, वय : ४२ वर्षे, धंदा : घरकाम, रा.नवी आबादी, विष्णुपुरी, नांदेड, ६. जयश्री भाउराव मनवर, वय : ४६ वर्षे, धंदा : घरकाम, रा.कृषीनगर, लेबर कॉलनी, अकोला, ७. पुजा शिवाजीराव पाईकराव, वय : ३९ वर्षे, धंदा : घरकाम, रा.शिवाजीनगर, नांदेड.

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

दावा: बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ व ३ प्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, मयत शिवाजी केरबा पाईकराव यांचा मृत्यु दिनांक ०३/०४/२०२६ रोजी नांदेड येथे झाला आहे. अर्जदार क्रमांक १ ही मयताची पत्नी, अर्जदार क्र. २ ते ७ हे मयताची मुले व मुली आहेत. सदरच्या अर्जात अर्जदारांनी अर्जदार क्र. १ ते ७ हे मयताचे वारसदार आहेत असे नमुद केले आहे. अर्जदारांनी वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटणा द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत किंवा दिनांक ०२/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जवाबदारी आपणावर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
क. लिपिक
सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
सहा.अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड

# वडार समाजाच्या प्रलंबित मागण्यांसाठी महसूल मंत्री बावनकुळे यांना निवेदन

उमरखेड/प्रतिनिधी-वडार समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी वडार महाराष्ट्राचा संघटनेच्या वतीने महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना यवतमाळ येथील शासकीय विश्रामगृहात निवेदन सादर करण्यात आले.

वडार समाजाच्या पारंपरिक व्यवसायाशी निगडित दगड, मुरूम व गौण खनिज व्यवसायातील अडचणी, रॉयल्टीतील सवलत, भूमिहीन कुटुंबांना जमीन व घरकुल, विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह व शैक्षणिक सुविधा, समाजभवन तसेच समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक विविध मागण्या निवेदनाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या. यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व समाजबांधवांनी वडार समाजाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी सविस्तर चर्चा केली. समाजाच्या मागण्यांची सकारात्मक दखल घेत आगामी कॅबिनेट बैठकीत संबंधित विषय मांडून ते तातडीने मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.यावेळी संघटनेचे विभागीय जिल्हाध्यक्ष पवन मेंढे व मी वडार महाराष्ट्राचा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे समाजाच्या प्रश्नांचा गांभीर्याने विचार करून सकारात्मक निर्णय घेण्यासाठी प्रयत्न करणारे मंत्री आहेत. वडार समाजाच्या न्याय्य मागण्यांना शासनस्तरावर योग्य न्याय मिळावा, यासाठी मी वडार महाराष्ट्राचा संघटना पूर्ण ताकदीने आणि सातत्याने पाठपुरावा करणार आहे. समाजाच्या प्रश्नांना केवळ आश्वासनांपुरते न ठेवता ते प्रत्यक्षात मार्गी लागेपर्यंत आमचा लढा आणि पाठपुरावा सुरूच राहील.

**- पवन मेंढे,** विभागीय जिल्हाध्यक्ष,
मी वडार महाराष्ट्राचा संघटना यवतमाळ

## जाहीर प्रगटन

नांदेड येथील सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,नांदेड यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.केतनकुमार तेलगांवकर)
दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१२१८/२०२६

अर्जदार : ०१) जितेंद्र राधाकिशन साबू वय-५५ वर्षे, व्यवसाय-व्यापार रा.एनडी ६ बी,नं.४ राम नगर, सिडको, नांदेड.

विरुद्ध

गैरअर्जदार : ०१) प्रशासक,सिडको,नांदेड रा.नवीन नांदेड,जि.नांदेड

प्रकरण : भारतीय वारसा कायदा,१९२५ च्या कलम २७८ नुसार प्रशासन प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात प्रशासन प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. मयत राधाकिशन पांडूरंग साबू हे दिनांक १५-०१-२०२३ रोजी मरण पावले. व मयत विजया राधकिशन साबू या दिनांक २८-०२-१९९१ रोजी मरण पावल्या आहेत. अर्जदार हा मयतांचा मुलगा आहे. मयतांची मिळकत घर क्र.END-6/45-Dblu.01/04 आहे. वर नमुद अर्जदारा शिवाय ईतर कोणीही मयतांचे कायदेशीर वारस नसल्याचे अर्जदारांनी अर्जात कथन केले आहे. अर्जदाराने मान्यवर न्यायालयात अर्जदारांच्या नावे प्रशासन प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी,प्रस्तूत प्रकरणी अर्जदारांच्या नावे प्रशासन पत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ३०-१०-२०२६ रोजी किंवा हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक ३०/०९/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
सह दिवाणी न्यायालय
व.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,
नांदेड

# फुलाजी पाटील पवार यांचे निधन

मुदखेड/प्रतिनिधी-पारडी वैजापूर ता. मुदखेड येथील ज्येष्ठ नागरिक फुलाजी पुंजाजी पाटील पवार यांचे दि. ३० बुधवार



वृद्धप काळाने निधन झाले आहे.मृत्यू समयी त्यांचे वय १०२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून नातवंड असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर राहत्या गावी पारडी या ठिकाणी आज ता.१ गुरुवार दुपारच्या सुमारास अंत्यसंस्कार करण्यात आले. कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती आप्पाराव पाटील पवार यांचे ते बंधू तर माजी सरपंच बाळासाहेब पवार यांचे ते काका होत.

# मुखेडचा ट्रिगर-१ मध्ये समावेश करा; अन्यथा पदवीधर निवडणुकीवर बहिष्कार

मुखेड/प्रतिनिधी-मुखेड तालुक्यातील पिके दुष्काळाने करपुन गेली असतांना देखील सरकारकडुन दुष्काळ जाहिर केलेल्या ट्रिगर-१ यादीतुन मुखेड तालुक्याला वगळण्यात आले आहे. मुखेड तालुक्याचा पदवीधर निवडणूकीपूर्वी ट्रिगर-१ दुष्काळ यादीमध्ये समावेश करा अन्यथा मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पदवीधर मुलांकडून पदवीधर निवडणूकीवर बहिष्कार टाकण्यात येणार असल्याचे निवेदन मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आ.सतीश चव्हाण यांना मा.जि.प.अध्यक्ष दिलीप पाटील बेटमोगरेकर यांनी दिले आहे.निवेदनावर शेतकरी नेते शिवशंकर पाटील कलंबरकर यांची स्वाक्षरी आहे.

# किनवटमध्ये नकार, इतर तालुक्यांत दस्तनोंदणीचा नियमबाह्य सपाटा

## गावठाणाबाहेरील भूखंडांच्या नोंदणीवर संशयाचे सावट

किनवट/प्रतिनिधी-गावठाण क्षेत्राबाहेरच्या भूखंडाच्या दस्तनोंदणीला तत्कालीन दुय्यम निबंधक विजय फड यांनी कायद्याचा दंडक दाखवून नियमबाह्य दस्तनोंदणीच्या फेटाळलेल्या संचिकेला नांदेड जिल्ह्यातील विशिष्ट तालुक्याकडे पाय फुटले आहेत. हिमायतनगर, माहूर, लोहा, कंधार, धर्माबाद, भोकर, नांदेड येथील दुय्यम निबंधक कार्यालयात संशयास्पद संचिकांच्या नोंदणीवर सपाटा लावला आहे. किनवट तालुक्यातील गावठाण क्षेत्राबाहेरच्या दस्तनोंदण्या तात्काळ थांबवून प्रत्येक प्रमाणपत्रांच्या चौकशीची मागणी करण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले.

किनवट येथील दस्तनोंदणी कार्यालयातील दुय्यम निबंधक विजय फड यांनी संशयास्पद गावठाण प्रमाणपत्रांवरील दस्तनोंदणीला कायमचा आळा घातल्यामुळे अवैध भूखंड व्यवहारात अडकलेल्यांनी भोकर, हिमायतनगर, धर्माबाद, कंधार, लोहा तसेच नांदेड येथील काही कार्यालयांमधून दस्तनोंदणीवर भर दिल्याचे ऐकायला मिळते. या व्यवहारांमध्ये प्रती दस्त ४५ ते ५० हजार रुपयांपर्यंत कथित विशेष शुल्क आकारले जात असल्याची चर्चा ऐकायला मिळते. मात्र, या आर्थिक व्यवहारांचे अधिकृत पुरावे अद्याप सार्वजनिक झालेले नसले तरी होत असलेल्या आरोपांची स्वतंत्र चौकशी होणे सुद्धा तेवढेच आवश्यक आहे. किनवटमध्ये एखाद्या दस्ताला नियमबाह्य ठरविले जात असेल आणि त्याच दस्ताच्या कागदपत्रांवर अन्यत्र नोंदणी होत असेल, तर दोन्ही निर्णयांची वरिष्ठ प्रशासनाने कायदेशीर कारणमीमांसा स्पष्ट करणे गरजेचे आहे. एकाच जिल्ह्यात नोंदणीचे निकष वेगवेगळे कसे ? हा सवाल तक्रारकर्त्याकडून उपस्थित केला आहे. गावठाण क्षेत्राबाहेरच्या भूखंडाचे गावठाण क्षेत्रात असल्याचे बोगस प्रमाणपत्रे तयार करणारे, त्यावर दस्त तयार करणारे आणि ते विविध कार्यालयांत सादर करणाऱ्यांची भूमिका तपासण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित मालमत्तेचा कायदेशीर दर्जा आणि प्रमाणपत्रांची सत्यताही पडताळणे आवश्यक असल्याचे सांगितले. संबंधित कार्यालयांमधील मागील काही महिन्यांतील संशयास्पद दस्तनोंदणींचे रेकॉर्ड तपासावेत, संबंधित प्रमाणपत्रांची पडताळणी करावी आणि दस्त सादर करणारे दलाल व संबंधित व्यक्तींची भूमिका तपासावी, अशी मागणी होत आहे. तसेच कथित आर्थिक व्यवहारांचे पुरावे शोधून संबंधित अधिकाऱ्यांच्या निर्णयप्रक्रियेची चौकशी करावी. आरोप सिद्ध झाल्यास नियमानुसार शिस्तभंगात्मक व फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी आहे. किनवटमध्ये अडलेले कथित व्यवहार जर शेजारील तालुक्यांतून सुरू असतील, तर हा प्रश्न केवळ एका कार्यालयापुरता मर्यादित राहत नाही. नोंदणी प्रक्रियेत पारदर्शकता, एकसमान निकष आणि अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची गरज निर्माण झाली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या आरोपांची स्वतंत्र चौकशी करून सत्य जनतेसमोर आणावे, अशी मागणी होत आहे.

# व्यावसायिक सिलिंडर ७० रुपयांनी महाग

नवी दिल्ली:नवरात्र, दसरा आणि दिवाळीच्या तोंडावर व्यावसायिक एलपीजी सिलिंडरच्या दरात वाढ करण्यात आली आहे. १ ऑक्टोबरपासून १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरच्या



दरात शहरानुसार ६२ ते ७० रुपयांची वाढ झाली आहे. त्यामुळे हॉटेल, रेस्टॉरंट, मिठाई दुकाने आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांचा खर्च वाढणार असून त्याचा परिणाम ग्राहकांच्या खिशावर होण्याची शक्यता आहे.सणासुदीच्या काळात हॉटेल, मिठाई आणि फराळाच्या पदार्थांची मागणी वाढत असते. व्यावसायिक गॅस महागल्याने उत्पादन खर्च वाढण्याची शक्यता असून त्याचा भार ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे सणासुदीत बाहेरचे खाणे आणि मिठाई महागण्याची चिन्हे आहेत. व्यावसायिक सिलिंडरच्या दरात सलग दुसऱ्या महिन्यात वाढ झाली आहे. सप्टेंबरमध्ये १० रुपयांची वाढ झाली होती. त्याआधी जुलैमध्ये १८३ रुपये आणि ऑगस्टमध्ये २०९ रुपयांनी दर कमी झाले होते. मात्र, आता पुन्हा दरवाढीचा फटका बसला आहे.




ज्येष्ठ नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी कलामंदिर ते जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य असा मोर्चा आज (गुरुवार) काढण्यात आला होता. या मोर्चात ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# मुदखेड तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची शिवसेनेची मागणी

मुदखेड/प्रतिनिधी-मुदखेड तालुक्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाचे अत्यल्प व अनियमित प्रमाण राहिल्याने शेतकरी गंभीर संकटात सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मुदखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करून शेतकरी व नागरिकांना दुष्काळी सवलती आणि शासकीय मदत तातडीने देण्यात यावी, अशी मागणी शिवसेना (शिंदे गट) भोकर विधानसभेचे नेते विश्वंभर पवार व पदाधिकाऱ्यांनी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, पावसाअभावी सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद आदी खरीप पिकांच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला असून अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली आहे. पिकांना आवश्यक त्या टप्प्यावर पुरेसा पाऊस न मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागत आहे. तसेच तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्यासह पशुधनासाठी पाण्याचा प्रश्नही गंभीर होण्याची शक्यता आहे. सद्यस्थितीचा परिणाम केवळ पिकांच्या नुकसानीपुरता मर्यादित नसून आगामी काळातील पाणीटंचाई आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही होण्याची शक्यता निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे शासनाच्या निकषांनुसार मुदखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तालुक्यातील सर्व गावांमध्ये पर्जन्यमान व पीक परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करावे, पीक नुकसानीचे पंचनामे करून पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार आर्थिक मदत द्यावी, तसेच दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमांनुसार उपलब्ध असलेल्या सर्व सवलती व मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. महसूल व कृषी विभागाच्या संयुक्त पाहणीतून मुदखेड तालुक्यातील वास्तविक दुष्काळी परिस्थितीचा अहवाल तयार करून तो शासनाकडे तातडीने पाठवावा. तसेच शासनाच्या दुष्काळी मदतीच्या निकषांमध्ये मुदखेड तालुका पात्र ठरत असल्यास त्याचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी भोकर विधानसभा प्रमुख मोहम्मद बुऱ्हान अब्दुल मजीद, दर्शन पाटील डुरे, ॲड. शेखरभाऊ कुंटे, मोहम्मद हकीम, शेख मुखीद, शेख समी, सय्यद जब्बार, मोहम्मद असलम यांची उपस्थिती होती.

# मांडवी येथे अपर तहसील कार्यालय मंजूर करण्याचे महसूल मंत्र्यांचे आश्वासन

## भाजप नेत्या संध्याताई राठोड यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने घेतली भेट



मांडवी/प्रतिनिधी-राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे नांदेड दौऱ्यावर आले असतांना शासकीय विश्रामगृह येथे भाजपच्या महिला नेत्या संध्याताई प्रफुल राठोड यांनी त्यांची भेट घेतली. मांडवी येथे अपर तहसील कार्यालय मंजूर करण्याची मागणी त्यांनी केली. ना.बावनकुळे यांनी मांडवीला अपर तहसील कार्यालय देण्याची स्पष्ट ग्वाही दिल्याने या मागणीला मोठे यश मिळणार आहे.

मांडवी परिसरातील ५२ खेड्यांमधील जनतेचा महसूल प्रशासकीय कामांसाठी होणारा त्रास लक्षात घेता, भाजप नेत्या संध्याताई प्रफुल राठोड यांनी महसूल मंत्र्यांसमोर परिसरातील नागरिकांची भावना मांडली. मांडवी भागात अपर तहसील कार्यालय मंजूर न झाल्यास जनतेचा भाजप पक्षावर तीव्र रोष निर्माण होत असल्याचे सांगत, त्यांनी या भागातील ५२ खेड्यांच्या सुविधेसाठी तात्काळ फक्त अपर तहसील कार्यालयाची मंजुरी देण्यात यावी, अशी स्पष्ट व ठाम भूमिका मांडली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मांडवी येथे अपर तहसील कार्यालय स्थापन करण्यासाठी शासन स्तरावर आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करून अपर तहसील कार्यालय दिले जाईल, अशी स्पष्ट ग्वाही त्यांनी यावेळी दिली. महसूल मंत्र्यांच्या या आश्वासनामुळे मांडवी परिसरातील ५२ खेड्यांतील जनतेत आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

# मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करा-गोजेगावकर

देगलूर/प्रतिनिधी- मुखेड तालुक्याचा दुष्काळग्रस्त यादीमध्ये समावेश करण्याची मागणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनिता ताई पवार व एकनाथ शिंदे यांच्याकडे राष्ट्रवादीचे नेते व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

मुखेड तालुक्याला दुष्काळग्रस्त यादीतून वगळल्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. मुखेड तालुका हा डोंगराळ भाग असून येथील पिकांची अवस्था देणे आहे.



नांदेड जिल्ह्यातील मुखेड वगळता इतर १४ तालुक्यांचा समावेश ट्रिगर एक मध्ये करण्यात आला असून ट्रिगर दोन मध्ये मुखेड तालुक्याचा समावेश करावा, मुखेड तालुक्यांमध्ये सोयाबीन पिकांची अवस्था अत्यंत बिकट असून शेतकरी चिंतेत आहेत. मागील दीड महिन्यापासून पावसाने उघडी दिल्यामुळे शेतामध्ये ओलावा राहिला नाही. त्यामुळे शेतातील उभे पिके वाळून जात आहेत. अशा परिस्थितीमध्ये मुखेड तालुका दुष्काळग्रस्त यादीमध्ये समाविष्ट होणे गरजेचे होते पण तांत्रिक बाबींमध्ये हा तालुका समाविष्ट झाला नसला तरी ट्रिगर दोन मध्ये या तालुक्याचा समावेश करून मुखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते व्यंकटराव पाटील गोजेगावकर यांनी मुख्यमंत्र्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

### नंदीग्राम एक्स्प्रेस दादरपर्यंत धावणार

नांदेड/प्रतिनिधी-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील प्लॅटफॉर्म क्र.१४,१५ आणि स्टॅबलिंग लाईनच्या पुनर्विकास कामासाठी १ ऑक्टोबर ते १५ डिसेंबर दरम्यान ७५ दिवसांचा विशेष ब्लॉक घेण्यात येणार आहे. या कामामुळे गाडी क्र.११००२ बल्लारशाह-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस नंदीग्राम एक्स्प्रेस ३० सप्टेंबर ते १४ डिसेंबर या कालावधीत सीएसएमटीऐवजी दादर स्थानकापर्यंतच धावेल.

## जाहीर प्रगटन

कंधार येथील जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.एम.एम.पाटील, जिल्हा न्यायाधीश-१ कंधार)
मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९
बाबाराव वि.बालाजी व इतर

प्रति

१. बालाजी संभाजी डांगे वय :- मेजर वर्षे, कामधंदा-व्यवसाय रा.पोखरभोसी ता.कंधार जि.नांदेड

ज्याअर्थी बाबाराव उर्फ बबन पि.श्यामराव घोरबांड वय ५० वर्षे रा.कलंबर खु., ता.लोहा, जि.नांदेड यांनी मोटार अपघात दावा अर्ज क्र.१७/२०१९ बाबाराव वि.बालाजी व इतर हा अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठी सदरील अर्ज या न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी उपरोक्त खटल्यात आपली उपस्थितीसाठी समन्स काढण्यात आले होते परंतु ते वारंवार न बजावता परत येत आहेत.

सबब हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

करीता दिनांक २३.१०.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपण जातीने किंवा वकिला मार्फत या न्यायालयात हजर रहावे.

याद्वारे आपणास नोटिस देण्यात येते की आपण दिनांक २३.१०.२०२६ रोजी या न्यायालयात उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अपघात मध्ये झालेल्या नुकसानी बाबत मावेजा मिळण्यासाठीचे प्रकरण एकतर्फी निकालात काढण्यात येईल.

आज दिनांक १६/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| **वरीष्ठ लिपीक** | **(अधिक्षक)** |
| जिल्हा न्यायालय,कंधार | जिल्हा न्यायालय,कंधार |

# लिंबोटी धरणातील घटत्या पाणी साठ्याच्या पार्श्वभूमीवर कंधारला पर्यायी पाणी पुरवठ्याची मागणी

कंधार/प्रतिनिधी-लिंबोटी धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत असल्याच्या पार्श्वभूमीवर कंधार शहरात संभाव्य पाणी टंचाई टाळण्यासाठी जुनी पाणी पुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करून पर्यायी पाणी पुरवठ्याची व्यवस्था करावी, अशी मागणी भाजपाचे कंधार शहराध्यक्ष ॲड. गंगाप्रसाद यन्नावार यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आणि कमी झालेल्या पर्जन्यमानामुळे सप्टेंबर अखेर लिंबोटी धरणात केवळ ३४.४६ टक्के पाणीसाठा शिल्लक असून, योग्य नियोजन न झाल्यास डिसेंबरपर्यंत पाणी उपलब्ध राहण्याबाबत प्रश्न निर्माण होऊ शकतो. या धरणातून कंधार, लोहा, अहमदपूर, उदगीर व पालम या शहरांना पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे पाणीसाठा कमी झाल्यास कंधार शहरांच्या पाणीपुरवठ्यावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. कंधार शहराच्या दोन्ही बाजूंना जलस्रोत उपलब्ध असतानाही योग्य नियोजन, समन्वय व तांत्रिक व्यवस्थापनाच्या अभावामुळे नागरिकांना पाण्यासाठी त्रास सहन करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्याच्या पाणीपुरवठा योजनेत वारंवार तांत्रिक बिघाड होत असल्याने आठ-आठ दिवस पाणीपुरवठा बंद राहण्याचे प्रकार घडत असून, त्याचा सर्वाधिक फटका सर्वसामान्य नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक व लहान मुलांना बसत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.संभाव्य पाणीटंचाई टाळण्यासाठी जुनी पाणीपुरवठा योजना तातडीने कार्यान्वित करावी, तसेच उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर करून पर्यायी पाणीपुरवठ्याचे नियोजन करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. भविष्यातील पाणीटंचाईची तीव्रता लक्षात घेऊन प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून नागरिकांना करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती द्यावी, अशी मागणी कंधार शहराध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार यांनी केली आहे.

# जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात शौर्यदिन उत्साहात साजरा

नांदेड/प्रतिनिधी-येथील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात २९ सप्टेंबर रोजी शौर्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त जिल्ह्यातील वीरनारी, वीरमाता-पिता तसेच माजी सैनिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. (निवृत्त) कर्नल राहुल माने यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ईसीएचएस नांदेडचे कर्नल एस. जॉन रस्किन (निवृत्त) होते. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा माहिती कार्यालयाचे चंद्रकांत कारभारी उपस्थित होते. भारतीय माजी सैनिक संघटनेचे अध्यक्ष सार्जंट रामराव थडके, सैनिक फेडरेशन मराठवाड्याचे अध्यक्ष लक्ष्मण देवदे यांच्यासह ३ वीरनारी, १ वीर पिता आणि विविध लष्करी मोहिमांमध्ये सहभागी झालेले माजी सैनिक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी कल्याण संघटक ऑ. कॅप्टन बळीराम गिराम (निवृत्त) यांनी प्रास्ताविकातून शौर्यदिनाचे महत्त्व विशद केले. भारतीय सशस्त्र दलाने २९ सप्टेंबर २०१६ रोजी नियंत्रण रेषेपलीकडे दहशतवादी तळांवर केलेल्या सर्जिकल स्ट्राईकच्या शौर्यपूर्ण कारवाईचे स्मरण यावेळी करण्यात आले. १८ सप्टेंबर २०१६ रोजी जम्मू-काश्मीरमधील उरी येथे लष्करी तळावर झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात आली होती, असे त्यांनी सांगितले.

पान १ वरुन

### भारतीय पायलट स्मित मच्छार...

त्यांच्या प्रकृतीची माहिती घेतल्याचेही त्यांनी नमूद केले.इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांनीही मच्छार यांच्या शौर्याची दखल घेतली. एका भारतीयाने मोठी दुर्घटना टाळल्याचे सांगत त्यांनी मच्छार यांना खरा नायक असल्याचे म्हटले. या घटनेच्या पार्श्वभूमीवर हल्ल्याबाबत विविध दावे आणि माहिती समोर आली असून, त्याची अधिकृत पातळीवर पडताळणी सुरू आहे.केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री के. राम मोहन नायडू यांनीही कॅप्टन मच्छार यांच्या धैर्याचे कौतुक केले. अत्यंत कठीण परिस्थितीत स्वतःचा जीव धोक्यात घालून त्यांनी प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले. त्यांच्या शौर्याचा देशाला अभिमान असल्याचे नायडू यांनी म्हटले.कॅप्टन स्मित मच्छार यांना हल्ल्यात गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर सौदी अरेबियातील तबूक येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीबाबत कुटुंबीय, मित्र आणि सहकारी चिंतेत असून ते त्यांच्या प्रकृतीच्या ताज्या अपडेटची प्रतीक्षा करीत आहेत. मच्छार लवकर बरे व्हावेत, यासाठी देशभरातून प्रार्थना केली जात आहे.कॅप्टन स्मित मच्छार यांच्या या धाडसी कृतीमुळे भारतीय वैमानिकांच्या धैर्याची आणि कर्तव्यनिष्ठेची पुन्हा एकदा जगभर चर्चा सुरू झाली आहे. स्वतः गंभीर जखमी असतानाही प्रवाशांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या मच्छार यांच्या शौर्याला देशवासीयांकडून सलाम केला जात आहे.

### जिल्हाधिकारी, आयुक्तांच्या...

आशिष हनवते, रामेश्वर बंडेवार,काकडे, गोविंद बरूडे, शेख मतीन,शेख आलिम, अब्दूल माजिद पत्रकार, शेख माजीद, अजय गोरे,राजु इराबत्तीन, प्रशांत हणमंते, किरणकुमार न्यालापल्ली, चंद्रशेखर पौला, नागेश निरडी, मो.नसिम, तेजु महाराज, मुंजाजी कावळे, भाग्यश्री नागेश्वर, अफरोजा खानम, सरोज नारलावार, कल्पना सकते, सविता गवते यांच्यासह शेकडो दिव्यांग सहभागी झाले होते.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४